अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "विभाग प्रमुख" म्हणून घोषित करणे.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,

शासन निर्णय क्र.अेपीओ-११००/२९३४/प्र.क्र.८३/पोल-३,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक:१८ सप्टेंबर २००१.

वाचा:- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/३६/र.व का./वि.प्र./२०००, दि.५ ऑक्टोबर, २०००.

शासन निर्णय:- अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली राज्यात एकूण ३६ महामार्ग पोलीस केंद्र व ३६ उपकेंद्रे आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली असणा-या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक/वित्त विषयक बाबी हाताळण्याच्या दृष्टीने, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक मधील अ.क्र.१, नियम क्र.२ नुसार प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन "विभाग प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सं. शं. इंगळे)
कार्यासन अधिकारी.

प्रत,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई-१,
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल ,महाराष्ट्र -१ (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता)मुंबई,
अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग,(विनियम /कोष-३,कार्यासन ) मंत्रालय, मुंबई-३२,
निवडनस्ती.